MAH/NAN/10936/2015
ISSN :2454-7905
SJF 2023 Impact Factor : 8.024

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal




(A Peer Reviewed) Vol. 2- ISSUE- LXXVI, 11 Feb 2023

## साहित्य समीक्षा व मराठी साहित्य

संपादक - प्रा. डॉ. प्रशांत भंडे

Scanned with CamScanner

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | साहित्य समीक्षा व मराठी साहित्य - डॉ. नम्रता वागडे | १० |
| २. | समीक्षा संकल्पना आणि स्वरुप - संगीता सोमवंशी | १५ |
| ३. | साहित्य समीक्षा : संकल्पना व प्रकार - राजीव के.आरके. | १८ |
| ४. | साहित्य मानससंबंधांचा व्यूह सिद्ध करणारी समीक्षा - डॉ. अंकुशकुमार चव्हाण | २३ |
| ५. | मराठी साहित्यातील मार्क्सवादी संकल्पना - प्रा. मारोती गोविंदराव गायकवाड | २६ |
| ६. | मराठी समीक्षेत समीक्षकांचे योगदान - प्रा. डॉ. संजीवकुमार सूर्यकांत पांचाळ | ३० |
| ७. | समीक्षा प्रक्रिया - डॉ. अक्षय किशोर घोरपडे | ३४ |
| ८. | मराठीतील मार्क्सवादी साहित्य विचार - डॉ.अशोक नारनवरे | ३७ |
| ९. | एकविसाव्या शतकातील स्त्री समीक्षकांचे योगदान - प्रा.उषा सिताराम पाटील | ४१ |
| १०. | १९७० च्या दशकातील दलित स्वकथनाचे स्वरूप - प्रा. डॉ. सुरेश व्यंकटराव कदम | ४५ |
| ११. | 'दलित साहित्या'च्या नामांतरामागील प्रयोजने आणि त्याची प्रस्तुतता - डॉ. अश्विनी आत्माराम तोरणे | ५० |
| १२. | 'ग्रामीण साहित्य : संकल्पना व स्वरूप' - प्रा. सुरेश लक्ष्मण नजन | ५६ |
| १३. | विविध वाङ्मय प्रवाहाचे विवेचन : ग्रामीण साहित्य - गीता किसन इंगळे | ६१ |
| १४. | ना. धों. महानोराच्या कवितेतील कृषि तथा निसर्गप्रतिमांचे अनेकविध रुप - प्रा.डॉ.बालाजी गणपतराव भंडारे | ६६ |
| १५. | स्त्रीवाद - डॉ. उज्ज्वला यशवंत सामंत | ७० |
| १६. | स्त्रीवाद आणि स्त्रीवादी साहित्य - सौ. माया नितिन पठाडे | ७४ |
| १७. | स्त्रीवादी चळवळ आणि साहित्य - प्रा. उज्ज्वला भोर | ७७ |
| १८. | स्त्रीवाद : संकल्पना, स्वरुप व भारतीय स्त्रीवादाची परंपरा - प्रा. डॉ जगताप यु. एस. | ८२ |
| १९. | आदिवासी साहित्य : व्याख्या, स्वरुप व संकल्पना - डॉ. शर्मिला बाळासाहेब घाटगे | ८५ |
| २०. | आदिवासी मावचीतील मौखिक संवाद (म्हणी व वाक्प्रचार) - गावित लता कथ्थू | ८८ |
| २१. | सातपुड्यातील आदिवासी तडवीची लग्नगीते - मुकेश एकनाथ सावळे | ९२ |
| २२. | आदिवासी कवी : देवेंद्र वसावे - डॉ. सुभाष सदाशिव पुलावळे | ९२ |
| २३. | देशीवाद आणि मराठी आदिवासी कविता - डॉ. संजय रमेश मेस्त्री | ९६ |
| २४. | मुस्लीम मराठी साहित्य चळवळ एक शोध - प्रा. डॉ. युवराज देवबा भामरे | १०१ |
| २५. | पुनर्निर्मितीचा साक्षात्कार घडविणारे 'काव्यातील पांडित्य' - प्रा. डॉ. कैलास सलादे | १०६ |
| २६. | कवी अजय कांडर यांच्या 'बाया पाण्याशीच बोलतात' या कवितेची समीक्षात्मक मांडणी - सहा. प्रा. सौ संजीवनी सुरेश पाटील | १०९ |
| २७. | माणूस असण्याच्या नोंदी : व्यवस्थेला प्रश्न विचारणारी कविता - शरद ठाकर | ११२ |
| २८. | बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील ग्रामीण स्त्री जीवन - प्रा. डॉ. मदकुंटे पी.एम. | ११८ |
| | | १२० |

# १२. 'ग्रामीण साहित्य : संकल्पना व स्वरूप'

प्रा. सुरेश लक्ष्मण नजन,
प्रवरा मेडिकल ट्रस्टचे आर्टस, कॉमर्स व सायन्स कॉलेज, शेवगाव

मराठी कादंबरी विविधांगाने विकसित होत असतांना ग्रामीण कादंबरी कुठेतरी मूळ धरू पाहत असलेली दिसते. गावातील लोक हे
पामुख्याने शेतीवर गुजरान लोक होत. भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि या देशातील साधारणतः ७०टक्के लोक ग्रामीण भागात राहतात.
महात्मा फुले यांच्या साहित्यातून ग्रामीण जीवन चित्रित झालेले आहे. जीवन जगण्याची पद्धत, गावामध्ये रूढ असलेल्या प्रथा, सामाजिक समस्या
व सामाजिक संबंध यांसारख्या अनेक बाबतीत नागरी समाजापेक्षा ग्रामीण समाज खूपच वेगळा आहे. ग्रामीण लोकांवर नैसर्गिक पर्यावरणाचा फार
मोठा प्रभाव असतो. त्यांच्या भूभागानुसार वातावरण, जीवन पध्दतीनुसार या लोकांची संस्कृती आकाराला आलेली असते.

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर खेडोपाडी शिक्षणाचा प्रसार होऊन ज्ञानाची गंगा सर्व स्तरापर्यंत पोहोचली. ग्रामीण तरुण
सुशिक्षित होऊन ज्ञानामुळे त्यांच्यात जागृती झाली. त्यातून त्याला आत्मभान आले. त्याला आलेले अनुभव, विचार तो मांडू लागला, लिहू लागला.
तर अशा परिस्थितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा नारा 'शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा' खेड्यातील तरुणांपर्यंत पोहोचला. त्यामुळे
समाजातील दलित, बहुजन वर्ग शिकू लागला. स्वाभाविकपणे दलित साहित्याची निर्मिती होण्याला सुरुवात झाली. याचवेळी महाराष्ट्रात यशवंतराव
चव्हाणांसारख्या व्यक्तीच्या हाती नेतृत्वाची धुरा आली. त्यांनी 'मोफत शिक्षण' हा नारा दिल्यामुळे शिक्षणाचा जोरात प्रसार झाला. खेड्यातील
तरुण शिकून आपले अस्तित्व शोधू लागला. स्वतःचे अनुभव मांडू शकतो, समाजजीवन, संघर्ष लिहू शकतो याची त्याला प्रकर्षाने जाणीव झाली.
त्यातून ग्रामीण तरुण लिहायला लागला. त्याला आलेले स्वानुभव, आजूबाजूचा परिसर, समाज, कुटुंबव्यवस्था, ग्रामजीवन, खेडे, गावगाडा, रूढी,
परंपरा यातूनच ग्रामीण साहित्य तयार झालेले दिसते.

महात्मा फुले, शाहू महाराजांनी ही भूमी नांगरून, कुळवून मशागत करून ठेवली होती. चहुबाजूकडे या विचारांनी लोक भारलेले होते.
बी पेरायचं काम या नंतरच्या सुशिक्षित मंडळींचं होतं ते त्यांनी योग्यरितीने केल्यामुळे त्यातूनच मराठी साहित्यात वेगवेगळे प्रवाह निर्माण झाले.
त्यातीलच एक प्रवाह म्हणजे ग्रामीण साहित्य होय. ग्रामीण साहित्याचे केंद्र ग्रामव्यवस्था आहे आणि ग्रामव्यवस्थेचा केंद्रबिंदू शेतकरी आहे. गावातील
समाजजीवन, निसर्ग, शेती व शेतीशी, गावाशी निगडीत असणारे घटक ज्यामध्ये चित्रित झालेले असतात. त्याला ग्रामीण साहित्य म्हणता येईल.
ग्रामीण साहित्याचा एक प्रकार म्हणजे ग्रामीण कादंबरी आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रसार झाल्याने बहुजन समाजाला आपल्या उपेक्षेची
व अन्यायाची जाणीव झाल्यामुळे तो आपला संघर्ष, व्यथा वेदना ग्रामीण कादंबरीतून मांडू लागला. ग्रामीण माणूस शतकानुशतके वेगवेगळ्या
संकटाशी सामना करीत आला आहे. १९ व्या शतकात शेतकऱ्यांचा, मजुरांचा संघर्ष चित्रित करण्याचे काम महात्मा फुले यांनी 'गुलामगिरी
व शेतकऱ्यांचा असूड' ही पुस्तके लिहून केले. शेतकऱ्यांच्या दुःखाचा पहिला उद्रेक म्हणजे शेतकऱ्यांचा असूड होय'. भारतीय माणसाच्या
गुलामगिरीचा इतिहास 'गुलामगिरी' या ग्रंथातून अवतरला आहे. महात्मा फुले यांचे व इतरांचे जीवन बदलून टाकणारे जे विचार आहेत. त्या
विचारांच्या कृतिशील आविष्काराच्या प्रवाहात जे लिहिले गेले ते ग्रामीण साहित्याची एक पूर्वपीठिकाच म्हणावी लागेल.

**ग्रामीण संकल्पना :**

ग्रामीण साहित्य ही संकल्पना मराठी साहित्यात व इतर भारतीय साहित्यात विसाव्या शतकात उदयाला आली आहे. 'ग्रामीण' या
विशेषणातील मूळ धातू 'ग्राम' आहे. हा मूळ संस्कृतमधील शब्द सामान्य नाम या प्रकारातील आहे. मराठीमध्ये याचा अर्थ गाव असा आहे. खेडेगाव,
शेतीवस्ती असे आणखीही अर्थ रूढ आहेत. परंतु ग्राम याचा नेमका अर्थ गाव असाच आहे. खेड्याचे जीवन कृषिजीवनाशी निगडीत असते.
निसर्गाशी प्रत्यक्ष संबंध खेड्यातील लोकांचा येतो. खेड्याचे नेमके स्वरूप ग्रामीण साहित्यिक आनंद यादव स्पष्ट करतात. 'खेडेगाव, तेथील
जीवनपद्धती, तेथील खास अशा रिती, शेती, तेथील निसर्गाशी, मातीशी असलेले मानवीपण, प्रदेशनिष्ठ वैशिष्ट्यपूर्ण संबंध, तेथील संस्कृतीला
लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्ट्ये, मानवी जीवनाला याच प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून
उद्भवणारे प्रश्न आणि समस्या'[२]. या साऱ्यांचा समावेश ग्रामीण या संज्ञेत करता येईल.

ग्रामीण कादंबरीचा विचार करण्यापूर्वी ग्राम संकल्पना समजावून घेऊ. 'खेडणे म्हणजे जमीन कसणे आणि खेडूत म्हणजे जमीन कसणारा
तेव्हा खेडूतांची जी वस्ती ते खेडे, ज्यामध्ये प्रधान धंदा शेती व ज्यामध्ये कसणाऱ्याची वस्ती शेतकऱ्यांची असते. त्या गावाला खेडे किंवा गावठे

म्हणतात[४]. खेडे म्हणजे असा मानवसमूह की त्याच्या ठिकाणी सामाजिक, सांस्कृतिक साम्ये दिसून येतात. तेथे लोकसंख्या कमी असून शेती हाच मुख्य व्यवसाय असतो.

**ग्रामीण साहित्य :**

ग्रामीण साहित्य ही संज्ञा २० व्या शतकात रूढ झाली असली तरी मराठी भाषेच्या प्रारंभापासूनच लोकसाहित्याच्या रूपाने प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. मराठीच्या अध्यात्मिक ग्रंथात ग्रामीण पार्श्वभूमी दिसते. महानुभाव संप्रदाय, लीळाचरित्र ग्रंथात अनेक ग्रामीण संदर्भ आलेले आहेत. ज्ञानेश्वरी या ग्रंथात शेती व अन्य व्यवसाय निसर्गाशी निगडीत आहेत यासंबंधी दृष्टांत आहेत. संतांच्या अभंगातून एकनाथांच्या भारुडातून ग्रामीण जीवन चित्रित झालेले दिसून येते. खऱ्या अर्थाने ग्रामीण जीवन डोळ्यासमोर ठेवून सर्वात प्रथम महात्मा फुले यांनी लेखन केले. त्यांच्याच प्रेरणेने रा.वि.टिकेकर व कृष्णराव भालेकर यांनी ग्रामीण कादंबरीलेखन केले. महात्मा गांधीजींनी 'खेड्याकडे चला' अशी हाक दिल्यानंतर मध्यमवर्गीय लेखकांचे लक्ष खेड्याकडे गेले. मध्यमवर्गीय लेखकांनी ग्रामीण जीवन स्वतः अनुभवले नसल्यामुळे प्रारंभीच्या लेखनामध्ये अस्सल ग्रामीण जाणीवा व्यक्त होताना दिसत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात सुशिक्षित झालेल्या तरुण मंडळींनी स्वतःच्या हाती लेखणी घेऊन स्वतःला आलेले अनुभव, संघर्षमय जीवन, कष्ट, गावगाड्याचे चित्रण करू लागले. विशेष म्हणजे या सुशिक्षितांनी जे अनुभवले, भोगले आहे ते आपल्या बोली भाषेतून मांडू लागला. बोली भाषेमुळे त्यातून सत्यता वाढू लागली. जे आहे ते मांडण्याची प्रखरता, वास्तवपणे ग्रामीण साहित्याच्या, कादंबरीच्या माध्यमातून लेखकांनी मांडण्याचा प्रयत्न केला. गावगाडा, कुटुंबव्यवस्था, सावकारशाही, अलुते-बलुते पद्धत, गावगाड्यातील दुःख, दारिद्र्य लेखक आपल्या शब्दांत साहित्याच्या माध्यमातून मांडू लागला.

ग्रामीण साहित्य ही संकल्पना एखाद्या प्रदेशांतर्गत जीवनातून निर्माण झालेल्या साहित्याला योजली जाते. त्या साहित्यात त्या प्रदेशातील वास्तव जीवनाचे प्रतिबिंब पडलेले असते. 'ग्रामीण साहित्य हे ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविणारे साधन आहे'[४] असे त्रिंबक नारायण अत्रे म्हणतात.

ग्रामीण साहित्याच्या व्याख्या :

१. डॉ.आनंद यादव : ग्रामीण जीवनातून फुलणारे आणि ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य.[५]

२. डॉ.भालचंद्र फडके : कोणत्याही भाषेतील जिवंत साहित्यात नित्यनवे वाङमयीन प्रवाह उदयाला येत असतात. हे नवे-नवे प्रवाह साहित्य समृद्ध करत असतात. त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर कालखंडात १९६० नंतर उद्याला आलेल्या मराठी साहित्यातील परिपुष्ट आविष्कार म्हणजे ग्रामीण साहित्य व दलित साहित्य होय.[६]

३. डॉ.नागनाथ कोत्तापल्ले : आदिम जीवनाचे संदर्भ ज्या साहित्यातून प्रकट होतात. त्याला ग्रामीण साहित्य म्हणावे.?

अशाप्रकारे वेगवेगळ्या अभ्यासकांनी ग्रामीण साहित्याचे स्वरूप त्यांच्या व्याख्येतून सांगितले आहे. ग्रामीण साहित्यामध्ये ग्रामीण भागाचे चित्रण येते. शेती; शेतकरी, गावगाडा हे मुख्य विषय ग्रामीण साहित्याच्या केंद्रस्थानी असणे गरजेचे आहे. एकूणच शेती व शेती व्यवसायाशी निगडीत इतर व्यवसाय करणाऱ्याचे जीवन चित्रण म्हणजे ग्रामीण साहित्य असे म्हणता येईल.

**ग्रामीण साहित्याचे स्वरूप :**

स्वातंत्र्यानंतरच्या पंधरा-वीस वर्षाच्या काळात मराठी साहित्यात दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य प्रवाह निर्माण झाले. या प्रवाहाच्या पाठीमागे एक वैचारिक बैठक आहे ती सामाजिक चळवळीमधून तयार झालेली आहे या चळवळीने ग्रामीण तरूण, सृजनशील, संवेदनशील मनाला अंतर्मुख केले. आत्मभान दिले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात सुशिक्षित झालेली तरुण पिढी आपले जीवनानुभव शब्दात मांडू लागली. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महान विभूतींच्या विचारांनी दलित साहित्य चळवळ, ग्रामीण साहित्य चळवळ भारलेल्या होत्या. त्यातूनच साहित्याच्या चळवळी निर्माण होऊ लागल्या. आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी फुले, आंबेडकर विचारवंतांना लेखणी हाती घ्यावी लागलेली होती. आपणच आपल्या समाजातील व्यथा, वेदनांना शब्दबद्ध केले पाहिजे अशी उर्मी त्यांच्यात निर्माण झाली. यातूनच दलित, ग्रामीण, आदिवासी, जनसाहित्य, स्त्रीवादी साहित्य इत्यादी प्रमुख प्रवाह साहित्यात निर्माण झाले.

भारत हा खेड्यांचा देश आहे आणि या देशातील बहुसंख्य जनता खेड्यापाड्यात, रानावनात, दऱ्याखोऱ्यात राहते. त्या लोकांचे प्रश्न, त्यांचे जीवन शहरी, मध्यमवर्गीय, पांढरपेशा, उच्चवर्णीयांच्या जीवनापेक्षा वेगळे आहे. ते शहरी माणसांपेक्षा अधिक कष्टमय दुःखद व अनेकपरिने अभावग्रस्त असे आहे. या समाजाचे शोषण करणारा वर्ग उच्चवर्णीय व शहरात राहणारा आहे. याकडे महात्मा ज्योतिबा फुले यांनी लक्ष वेधले. ग्रामीण जीवनाच्या केंद्रस्थानी शेतकरी आहे. कारण शेती हाच तेथील मुख्य व्यवसाय आहे. या व्यवसायाला जोडून इतर लहान मोठे व्यवसाय येतात. शेती पिकली तर सर्व आबादी आबाद ती न पिकली तर मात्र सर्वत्र बर्बादी असे ग्रामजीवनाचे सूत्र आहे. अशा शेतकऱ्यांचे शोषण शेटजी,

भटजीकडून कसे होते ? अज्ञानामुळे शेतकरी स्वतःच स्वतःच्या परिस्थितीला कसा कारणीभूत ठरतो ? त्यासाठी त्याला आत्मभान येण्याची कशी गरज आहे ? आणि शासनानेही त्याला या कामी मदत करण्याची कशी गरज आहे या संबंधाने अत्यंत तर्कसुसंगत व परखड विचार महात्मा फुलेंनी त्यांच्या 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथात मांडले आहे? याच ग्रंथात त्यांनी शासकीय कर्जधारक शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेचे, त्यांच्या हलाखीच्या मनोवस्थेचे व त्यांच्या घराचे वास्तववादी चित्रण केले आहे. या त्यांच्या ग्रंथामध्ये आपल्याला आधुनिक ग्रामीण साहित्याची बीजे पहिल्यांदा दिसतात.

मराठी ग्रामीण वाङ्मयाला १९४५ नंतर बहर आला असला तरि ते हरिभाऊ आपटे यांच्या कथा कादंबऱ्यांइतके जुने आहे. उदाहरणादाखल हरिभाऊंची 'काळ तर मोठा कठीण आला' ही कथा किंवा धनुर्धारी यांची 'पिराजी पाटील' ही कादंबरी मराठी वाङ्मयाच्या आधुनिकतेच्या जन्माच्या वेळीच निर्माण झालेली आहे. महाराष्ट्रातील ग्रामजीवन तेथील व्यक्ती हाच त्यांचा विषय आहे. असे असले तरी ग्रामीण वाङ्मय या वेगळ्या नावाखाली ते त्यावेळी ओळखले जात नव्हते. शिवाय ग्रामीण वाङ्मयाची वेगळी प्रेरणा घेऊन ते जन्माला आले नव्हते?

१९२० नंतर राजकीय परिस्थितीत झालेल्या बदलांचा परिणाम सामाजिक दृष्टीवरही झाला. गांधीजींची दृष्टी राजकारणासह सर्व जीवनाला व्यापणारी होती. गांधीजींची खेड्यांचे भारतीय जीवनातील स्थान नव्या जाणिवांसह पटवून दिले. या घटनांचा परिणाम होऊन साहित्यिकांची दृष्टी खेड्याकडे वळली. तेथे आपले खरे भारतीय जीवन आहे तेथील लोकांचा उद्धार झाला पाहिजे. त्यांच्या जीवनातील विषमता, दारिद्य, अज्ञान, परंपराप्रियता नाहीशी झाली पाहिजे. समानतेच्या भूमिकेवरून वागविले पाहिजे. तेथे समाजसुधारणा व समाजोध्दार करायला भरपूर वाव आहे. अशा प्रकारच्या सामाजिक व राजकीय जाणिवांनी प्रादेशिक साहित्य या नावानिशी या काळात ग्रामीण वाङ्मय निर्माण होऊ लागले. वि.स.सुखटणकर, लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या या काळतील आरंभीच्या कथा वाचू लागल्यावर किंवा ना.वि.कुलकर्णी, रामतनय, भा.वि.वरेरकर यांच्या याच काळतील ग्रामीण जीवनावरील कादंबऱ्या वाचत असतांना आधी सांगितलेल्या प्रेरणांचा त्यांच्या साहित्यावर प्रभाव असल्याचे स्पष्ट दिसून येते[१०].

ग्रामीण जीवन रेखाटण्यापेक्षा या समाजाचे जे प्रश्न, समस्या आहेत, जी दुरावस्था आहेत ती लक्षात घेऊन तिच्यावरील उपायांची, सोडवणुकीची आणि उद्धार कल्पनांची मनाशी खुणगाठ बांधून त्यानुसार ते जीवन सुरुवातांच्या काळात लेखकांनी नांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. १९४०-४५ च्या काळात श्री.म.माटे यांनी प्रथम ग्रामीण जीवन जवळून, प्रत्यक्ष अनुभव घेऊन पाहिले. ग्रामीण जीवनातील प्रत्यक्षातील समस्या, रोजच्या जीवनातील छळणारे प्रश्न, प्रत्येक क्षणाला नडणारे दारिद्र्य आणि अज्ञान तरीही त्यांच्याकडे दिसुन येणारी माणुसकी हे सर्व प्रथम त्यांनी पाहिले. त्या जीवनाचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतल्यामुळे माटे यांनी लिहिलेली ग्रामीण कथा खऱ्या जीवनाचे एक वेगळेच तेज घेऊन जन्माला येते. 'जे वाटले ते लिहिले' या त्यांच्या भूमिकेमुळे ग्रामीण जीवनर्दान प्रखरपणे घडलेले दिसते.

नव ग्रामीण वाडमयाला खराखुरा प्रारंभ करून दिला तो विभावरी शिरूरकर यांच्या 'बळी' या १९५० साली प्रसिद्ध झालेल्या कादंबरीने. अस्पृश्य वर्गाच्याही पलीकडे असलेल्या चोरट्या जमातीच्या जीवनातील प्रखर वास्तव अतिशय प्रभावीपणे या कादंबरीत मांडले आहे. समकालीन समाज जीवनाला धक्का देऊन ही कादंवरी उभी राहिलेली दिसते. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यातही ग्रामजीवनातील रुढी, समजुती, अज्ञान, दारिद्र्य, जगण्यासाठी चाललेली अनेकविध व्यक्तींची धडपड इत्यादी विषय दिसतात. माडगुळकरांच्या अनुभवात अधिक बारकावे, अधिक सच्चेपणा, अधिक खाचाखोची, बारीक ताण-तणावे त्यांनी हेरलेले आहे त्यात विविधता दिसते. याच काळात द.मा. मिरासदार यांनी विनोद हीच एकमेव प्रेरणा घेऊन ग्रामीण विनोदी कथा लिहिलेल्या दिसतात. स्वातंत्र्यपूर्व काळत या बहुजन समाजातील बऱ्याच मोठ्या भागाला आपले 'जिणे' लाजिरवाणे वाटत होते ते व्यक्त करणे शक्य नव्हते पण स्वातंत्र्यानंतरच्या काळात हक्काचे अत्यंत मोलाचे आणि महत्त्वाचे लेणे या समाजाला लाभले. त्यामुळे या समाजाची न्यूनगंडाची भावना संपवून त्यांच्यात जागृती निर्माण झाली. लोकशाहीतील निवडणूकांनी राजसत्ता, अर्थसत्ता नवीन लेखकांना प्राप्त झाली. त्यांच्या योगाने नवे शिक्षण, नव्या सुधारणा, नवी ध्येये समोर ठेवून त्यांच्या पूर्ततेसाठी नवे कायदे निर्माण झाले. या सर्वांचा परिणाम स्वतःच्या परिस्थितीचे ज्ञान घेण्यात झाला. त्यामुळे दारिद्र्यात जगणे, अज्ञानात खितपत पडणे, मागासले राहणे कमीपणाचे वाटू लागले. परिस्थितीशी, नव्या जाणिवांशी झगडा सुरू झाला. आलेल्या व येणाऱ्या अनुभवांना आणि प्राप्त जीवनातील गोष्टींना नव्याने वाचा फुटली.

नव्याचे आकर्षण इतर क्षेत्रातल्याप्रमाणे सामान्य वाचकालाही असते. या काळत ग्रामीण साहित्याला मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळाली. त्याचा फायदा अनेक सामान्य ग्रामीण लेखकांना मिळाला. ग्रामीण साहित्याच्या या लोकप्रियतेमुळे महाराष्ट्राच्या विविध प्रदेशातून त्याची निर्मिती होऊ लागली. या लाटेत बहुसंख्य लेखकांची प्रेरणा प्रामुख्याने आपापला परिसर आपापल्या साहित्यात मांडण्याची दिसते. ग्रामीण साहित्य निर्मितीमुळे कोकण, सांगली, सातारा, कोल्हापूर, खानदेश, मराठवाडा, विदर्भ आदी प्रदेशांचे जीवन चित्रण झालेले दिसते. त्यात उच्च मराठा, शेतकरी-कामकरी-महार-मांग-चांभार-मराठा-मुस्लिम या स्तरांचे चित्रण विशेष झालेले आहे.

भारतीय संस्कृतीची खरी जपवणूक खेड्यातच होते. यासाठी खेडी सुधारली पाहिजेत. तेथील लोकांचे जीवन उन्नत झाले पाहिजे. छोटे-छोटे उद्योगधंदे सुधारले पाहिजे. ग्रामव्यवस्थेच्या केंद्रस्थानी असलेल्या शेतकरी आणि त्याच्याभोवताली असणारा कष्टकरी समाज सुधारला पाहिजे. या जाणिवेतून महात्मा गांधीजीनी आपल्या अनुयायांना 'खेड्याकडे चला'ची हाक दिली. ग्रामीण जीवनातील विषमता, अज्ञान, दारिद्र्य, अनिष्ट रूढी आणि परंपरानिष्ठता, अभिमानशून्यता इत्यादी. नष्ट करून त्यांची अस्मिता जागृत करण्याचे, त्यांना आत्मभान देण्याचे प्रयत्न या ग्रामीण कादंबरीच्या माध्यमातून सुरू झाले''. त्यांच्या व्यथा, वेदना, संघर्ष, अनुभव मांडण्याचे काम, ग्रामजीवन, प्रत्यक्ष तेथील परिस्थिती, समस्या, कादंबरीतून मांडण्याचे काम ग्रामीण लेखक करू लागले. ग्रामीण भागातील परिस्थिती, शेती व शेतकऱ्यांची अवस्था, दुष्काळ यांसारख्या समस्या सर्वांना कळाव्यात या दृष्टीने काही लेखक लिहू लागले. भारतातील ७०टक्के जनता खेड्यात राहते. उदरनिर्वाहाचे साधनम्हणून शेतीकडे पाहिले जाते. अन्नधान्याचा पुरवठा शेतीतून केला जातो. मग या शेतीची काय परिस्थिती आहे, शेती कसणाऱ्यांची काय जन-जीवन आहे या सगळ्या गोष्टीची माहिती जगापर्यंत; सर्वसामान्यापर्यंत पोहोचण्यासाठी किंवा या शेतकरी वर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी, त्यांच्या कष्टाच्या बदल्यात त्यांना योग्य तो मोबदला मिळवून देण्यासाठी काही लेखकांनी आपल्या साहित्यातून वास्तव मांडण्याचा प्रयत्न केला.

१९६० ते १९७० च्या काळात ग्रामीण वातावरणात आणखी बदल झालेला दिसतो. प्रत्यक्ष कष्टकरी ग्रामीण समाजातून आलेले संवेदनशील लेखक लिहू लागले. रा.रं.बोराडे, आनंद यादव, शंकरराव खरात, बाबा पाटील, मधु मंगेश कर्णिक, महादेव मोरे, बाबुराव बागुल, सखा कलाल, चंद्रकुमार नलगे, द.ता.भोसले, चारुता सागर इ. लेखक त्यांच्या कथा कादंबऱ्यांमधून ग्रामीण वास्तव चित्रित करू लागले. ग्रामीण माणसांच्या मूलभूत जाणिवा व्यक्त करणे त्यांना महत्त्वाचे वाटत होते. धग, माझा गाव, टारफुला, गोतावळा, पाचोळा इ. यंत्र व विज्ञान यांचा प्रसार यामुळे खेड्यात झालेल्या सुधारणा, बदल, यातून निर्माण झालेल्या समस्या, ग्रामीण मनावर झालेला परिणाम यांचेही प्रत्ययकारी दर्शन ग्रामीण कादंबरीत होऊ लागले''[१२].

महात्मा फुले यांच्या अनेक अखंडातून उघड्या नागड्या शेतकरी, कुणब्यांची दैनावस्था व त्या अवस्थेस कारणीभूत असणारे अज्ञान, धर्मातील कर्म विपाकाच्या धातूर-मातूर गोष्टी, शेठ सावकारांची फसवेगिरी, वकील न्यायाधीशांची दादागिरी, स्वकियांची मवलेगिरी या समाजातील तीन शेंडीविषयी परखड मत त्यांनी मांडले आहे. म्हणून त्यांना ग्रामीण साहित्याची पहिली प्रेरणा मानतात. 'ग्रामीण वाङ्मयाच्या निर्मितीला प्रेरणा देणारी महान शक्ती म्हणजेच नागरी जीवनापासून ग्रामीण जीवनाची असलेली प्रकृती भिन्नता होय''[१३].

मुळमध्ये ग्रामीण साहित्याचा हेतूच ग्रामीण भागातील जीवन, शेती, गावगाडा इ. गोष्टीवर होत असलेला अन्याय साहित्याच्या माध्यमातून समाजासमोर आणणे. शेतकऱ्यांचा संघर्ष, कृषिजीवनाची वास्तव परिस्थिती त्यामध्ये त्यांच्यावर होत असलेला अन्याय, दारिद्र्य, शिक्षण सुधारणा, खेडी सुधारली पाहिजे, शेतकऱ्यांसाठी शासनाने काही उपाययोजना केल्या पाहिजेत. ओला दुष्काळ, सुका दुष्काळ यामुळे पिकांची होणारी नासाडी, शेतीवर असणारा कुटुंबाचा उदरनिर्वाह, रूढ असलेल्या प्रथा, परंपरेत अडकत चाललेल्या ग्रामीण माणूस, शेतीत पिकणाऱ्या मालाचा भाव, हमीभाव, इ. गोष्टींना समोर आणण्याचा प्रयत्न व त्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला त्यांना कसा मिळेल ? त्यांची परिस्थिती कशी सुधारेल ? या गोष्टी वास्तवतेने मांडण्याचा प्रयत्न ग्रामीण लेखकांनी केलेला आहे आणि हेच प्रयोजन ग्रामीण कादंबरी निर्मितीमागे असलेल्या आपल्याला दिसून येते. मुळत ग्रामीण साहित्याची प्रेरणात वास्तववादी आहे.

काळाच्या ओघात साहित्याच्या प्रेरणा भिन्न भिन्न असल्याच्या दिसतात. मध्ययुगीन काळात संताच्या साहित्यामागे आध्यात्मिक प्रेरणा दिसते तर पंडितांचे कवितेमागे निखळ रचनेची, पांडित्याची प्रेरणा आढळते. शाहिरी कवितेमागे कलंदर प्रवृत्तीतून उपजलेली अर्थार्जनाची प्रेरणा दिसते. एकोणिसाव्या शतक जहाल-मवाळ, सनातनी सुधारणा, इंग्रज त्यातूनच राष्ट्राभिमान, देशप्रेम, स्वधर्म, जिज्ञासा अशा अनेक निगडीतून निर्माण झालेल्या साहित्यिकृती दिसतात. साठोत्तरी साहित्यात प्रामुख्याने ग्रामीण साहित्य, दलित साहित्य हे प्रवाह आहेत. 'दलित साहित्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारवंत ठाम उभे आहे आणि त्या पाठीमागे आंबेडकरी विचारांचे अधिष्ठान आहे. ग्रामीण साहित्यासंदर्भात अशी कुठली एकच प्रेरणा सांगता येणे शक्य नसले तरी 'गाव' हीच ग्रामीण साहित्यामागची खरी प्रेरणा आहे'?? असे म्हणता येते. गावाच्या मातीचे संस्कार, तिथले प्रामाणिक अनुभव आणि माती व माणसं यांच्याविषयी वाटणारा जिव्हाळा, गावाची रहाटी, समूहजीवन ग्रामीण साहित्यामध्ये उमटलेले दिसते.

संदर्भ :

१. भास्कर शेळके, संशोधन स्वरूप आणि व्याप्ती, शब्दपक्षी प्रकाशन, जुन्नर २०१३ पृ.क्र.२२४

२. आनंद यादव, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीयावृत्ती १९९३, पृ.क्र.०६

३. त्रिं. ना.अत्रे, गावगाडा, वरदा प्रकाशन, पुणे तृतीयावृत्ती १९८९ पृ.क्र.०५

४. तत्रैव त्रिं. ना.अत्रे पृ. क्र. १४३

५. उनि आनंद यादव पृ.क्र १०

६. भालचंद्र फडके, दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती १९७७ पृ.क्र.१०

७. नागनाथ कोत्तापल्ले , ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे प्रथमावृत्ती पृ.क्र.२४

८. वासुदेव मुलाटे, ग्रामीण साहित्य, स्वरूप व दिशा, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद तृत्तीयावृत्ती पृ.क्र. ०४,०५

९. उनि आनंद यादव पृ.क्र. ६३

१०. तत्रैव पृ. क्र. ६४,६५

११.उनि, वासुदेव मुलाटे पृ. क्र.०७

१२. उनि, वासुदेव मुलाटे पृ.क्र.१३

१३. उनि, मोहन पाटील पृ.क्र. ०७

१४. उनि, मोहन पाटील पृ.क्र. ८४,८५